**राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना सुरू करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२००८/३३८९२(१८१/०८)/माशि-३,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १८ फेब्रुवारी, २००९.

**वाचा:-** १) शासन निर्णय क्र.अर्थसं-५९०८(प्र.क्र.५०/०८)/अर्थसंकल्प, दि. २८ जानेवारी, २००९.

**प्रस्तावना :-**

राज्यात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणा बरोबरच माध्यमिक शाळांचा विकास व विस्तार मोठ्या प्रमाणात झालेला आहे. शिक्षण हे व्यक्तिमत्व विकासाचे मूलभूत साधन असल्यामुळे सुरूवातीपासूनच राज्यात स्त्री शिक्षणाला महत्व देण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने शासनाने महिला धोरण २००१ जाहिर केलेले असून त्या अंतर्गत महिलांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील शाळांमध्ये मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करण्याकरीता व मुलींना शिक्षणाकडे आकर्षित करून घेण्याच्या दृष्टीने या धोरणांतर्गतच माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या दारिद्र्य रेषेखालील इयत्ता ८ वी च्या मुलींसाठी मोफत लेडीज सायकल वाटप करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार ‘राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना’ सुरू करण्यास शासनाची मान्यता देत आहे.

**शासन निर्णय-**

‘राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना’ या योजनेंतर्गत शासन मान्यता प्राप्त अनुदानित माध्यमिक शाळेतील दारिद्र्य रेषेखालील इयत्ता ८ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींना लेडीज सायकल पुरविण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेकरीता रूपये २०.०० कोटी इतका अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२. दारिद्र्य रेषेखालील लाभार्थीस खालील अटी व शर्तीनुसार सायकल वाटप करण्यात यावे.

(१) इयत्ता ८ वी तील दारिद्र्य रेषेखालील मुली या योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहील.

(२) ग्रामीण भाग व क वर्ग नगरपरिषद क्षेत्रातील शाळा या ठिकाणी योजना लागू राहील.

(३) लाभार्थींचे घर व शाळेचे अंतर कमीत कमी २ कि.मी. एवढे असावे.

(४) इतर योजनेतून लाभार्थीस सायकल प्राप्त झाल्यास, या योजनेचा लाभ मिळणार नाही.

(५) इयत्ता ७ वी मध्ये कमीत कमी ४५% गुण प्राप्त केलेले असावेत.

(६) लाभार्थी ही शासन मान्यता प्राप्त अनुदानित माध्यमिक शाळेत शिक्षण घेत असावी.

(७) लाभार्थीची निवड करतांना दुर्गम / अतिदुर्गम ग्रामीण भाग तसेच शहरी भागातील झोपडपट्टी/गलिच्छ वस्तीतील मुलींना प्राधान्य द्यावे.

३. सदर योजना ही शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) यांच्या स्तरावर राबवावयाची असून त्यांनी निकषाप्रमाणे लाभार्थ्यांची निवड करावयाची आहे.

४. या योजनेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या लेडीज सायकली या आयएसआय मार्कच्या असाव्यात, तसेच त्या सिंगल साईड स्टँड, घंटी, कॅरियर व कुलूप किल्ली सहीत असाव्यात व त्यावर 'राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजनातून' सायकल पुरविली असल्याबाबत ठळक अक्षरात नमूद केलेले असावे.

५ या योजनेंतर्गत वरील प्रकारच्या लेडीज सायकली पुरविण्यासाठी जाहिर निविदा मागविण्यात येऊन पुरवठेदाराची निवड करण्यात यावी. जाहीर निविदा मागविण्याची प्रक्रीया महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई या कार्यालयामार्फत करण्यात यावी. निविदेच्या प्रक्रीयेनंतर येणाऱ्या दरास अंतिम मान्यता शासनाची घेण्यात यावी.

६. या योजनेसाठी चालू आर्थिक वर्षात (सन २००८-०९) रू. २०.०० कोटी एवढा खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र.ई-२-२२०२ सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण, ११० अशासकीय माध्यमिक शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयांना सहाय्य(००) (१४) मुलींना मोफत सायकली पुरविणे (२२०२३८५१) ३१ सहाय्यक अनुदाने आणि २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण, ११० अशासकीय माध्यमिक शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयांना सहाय्य (००) (१५) विशेष घटक योजनांतर्गत मुलींना मोफत सायकली पुरविणे (२२०२३८६२).

७. ही योजना राबविण्यासाठी शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांना नियंत्रक, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

८. सदर आदेश वित्त विभागाच्या मान्यतेनुसार व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक- ६६०/२००८/व्यय-५ दि.२२/१०/२००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर आदेश शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून, त्यांचा संगणक संकेतांक क्रमांक २००९०२१८१९४२५३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

( अ.मा. भट्टलवार )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे स्विय सहायक
मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे स्विय सहायक
मा. राज्यमंत्री ( क्रीडा ) यांचे स्विय सहायक
मा. सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ) यांचे स्विय सहायक
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
स्थानिक निवासी लेखा परिक्षा अधिकारी ,मुंबई.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक ( प्राथमिक / प्रौढ / SCERT /), महाराष्ट्र राज्य, पुणे.
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई.
संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व
उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, सर्व
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद सर्व .
शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) जिल्हा परिषद सर्व
जिल्हा क्रीडा अधिकारी, सर्व
अधिक्षक, वेतन पथक (प्राथमिक / माध्यमिक) (सर्व )
वित्त विभाग(व्यय-५/अर्थसंकल्प-६), मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
निवड नस्ती, माशि-३-२००९.

••••••••••